**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. ६**
**सभावृत्तांत**

दिनांक :- ५/११/२०१९ वेळ :- दुपारी १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ५/११/२०१९ रोजी दुपारी १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.करुणा शेखर चिंचवडे | - | सभापती |
| २. | मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ | - | सदस्य |
| ३. | मा.संगिता राजेंद्र भोंडवे | - | सदस्य |
| ४. | मा.नामदेव जनार्दन ढाके | - | सदस्य |
| ५. | मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई | - | सदस्य |
| ६. | मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील | - | सदस्य |
| ७. | मा.राजेंद्र तानाजी गावडे | - | सदस्य |
| ८. | मा. विनोद जयवंत नढे | - | सदस्य |
| ९. | मा.निता विलास पाडाळे | - | सदस्य |
| १०. | मा.उषा दिलीप काळे | - | सदस्य |
| ११. | मा.संतोष अंकुश कोकणे | - | सदस्य |
| १२. | मा.बिभीषण चौधरी | - | नामनिर्देशीत सदस्य |
| १३. | मा.देविदास पाटील | - | नामनिर्देशीत सदस्य |
| १४. | मा.विठ्ठल भोईर | - | नामनिर्देशीत सदस्य |

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती प्रभा गाडेकर – प्रशासन अधिकारी, श्री.रामदास तांबे – कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा श्री.प्रशांत पाटील - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, श्री.इ.बी.पाटील - कार्यकारी अभियंता,विद्युत,श्री.पारोल के.बी (मुख्य आरोग्य निरीक्षक), मा.आर.एम.इंगळे – उपअभियंता स्थापत्य विभाग, मा.सी.एन.धानोरकर, उपअभियंता स्थापत्य विभाग, श्री.देवकते – कनिष्ठ अभियंता,विद्युत, श्री.घारे, श्री.मोने – कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, श्री.नरोटे – उपअभियंता, स्थापत्य, उद्यान, श्रीमती अमृता लागु – लेखाधिकारी इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभापती करुणा शेखर चिंचवडे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

दिनांक ०९/०९/२०१९ रोजीचा सभावृत्तांत क्र.५ कायम करणेत आला

ठराव क्र. विषय क्र. १

दि. ५/११/२०१९

सुचक : मा. अनुमोदक: मा.

मा.मोरेश्वर भोंडवे यांचे दि.५/०९/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.१६ येथील सर्वे नंबर २०५/१ रावेत येथे असलेल्या श्री.बाळु नारायण पालेकर व रुषिकेश अशोक पालेकर यांच्या खाजगी मिळकतींना वै.नारायण रामभाऊ पालेकर कॉर्नर असे नाव देण्यास मान्यता देणेबात विचार करणे.

खाजगी मिळकतींना नाव देणेचे अधिकार मनपास नसलेने सदरचा विषय दप्तरी दाखल करण्यास सर्वानुमते मान्यता देणेत आली.

------------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. करुणा शेखर चिचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[करुणा शेखर चिंचवडे ]
सभापती
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/१६/२०१९.
दिनांक : १९/११/२०१९

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब क्षेत्रिय कार्यालय ,चिंचवड

क्र.बक्षेका/ २ / १४ /२०१९

दिनांक - १६/११/२०१९

प्रति,

सर्व विभागप्रमुख,
ग क्षेत्रिय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय - मा.ब प्रभाग मासिक सभेमध्ये झालेल्या विषयांवर योग्य ती कार्यवाही करणेबाबत..**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ नुसार प्रभाग समितीची स्थापना करण्यात आली असुन सदरच्या समिती या कायद्याने गठीत केलेल्या आहेत. प्रभाग समितीत होणा-या कामकाजाबाबत कार्यवाही करणे हे संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची जबाबदारी आहे.
ब क्षेत्रिय कार्यालय प्रभाग समिती मासिक सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येते, या सभेत सर्व संबंधित शाखाप्रमुख यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तथापि सदर सभेस काही विभागांचे शाखाप्रमुख उपस्थित राहत नसलेबाबत सन्माननीय सदस्य यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच सदर बाब मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणुन देण्यात यावी, असे मा.नगरसदस्यांनी सांगितले आहे.

माननीय सदस्य यांनी आपले विभागाशी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर अभ्यासपुर्वक माहिती समिती सभेत देणेत यावी तसेच प्रभाग समितीत झालेल्या सभावृत्तांतातील ठरावांवर नियमाधीन कार्यवाही करणेत यावी. याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडुन कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची स्पष्ट नोंद घ्यावी. दिनांक ५/११/२०१९ रोजी झालेल्या मासिक सभेमध्ये नगरसदस्यांनी खालीलप्रमाणे आपल्या समस्या मांडल्या, त्यावर लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा उचित अहवाल उलट टपाली प्रशासन विभाग, ब क्षेत्रिय कार्यालय येथे पाठविणेत यावा.

| अ.क्र. | मा.नगरसदस्य | उपस्थितीत केलेले प्रश्न | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १ | मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई (प्रभाग क्र.१७-ब) | १) दळवीनगर पुलाजवळ रस्त्याच्या दोन्ही बाजुंना हातगाडया लागलेल्या असतात.<br>२) प्रेमलोक पार्क , कमिशनर बंगलो येथेही अनेक हातगाडया आहेत. फुटपाथवरील सर्व अतिक्रमण लवकरात लवकर काढण्यात यावे | अतिक्रमण |
| २ | मा.राजेंद्र गावडे (प्रभाग क्र.१८ ड) | १) चित्तराव गणपती येथेही अनेक वाहने रस्त्यात पार्क केली जातात, तेथे नो पार्किंग चा बोर्ड लावण्यात यावा.<br>२) प्रभाग क्र.१८ मधील जुना जकात नाका ते पवनानगर रस्ता येथे श्री.यल्लप्पा कु-हाडे मार्ग या नावाचा फलक बनविण्यात येऊन लावण्यात यावा.<br>३) प्रभाग क्र.१८ मधील २४X७ ची बंद कामे चालु करण्यासंदर्भात मिटींग आयोजित करा.<br>४) पाणी गळती १००% थांबली पाहिजे. | स्थापत्य |
| ३ | मा.निता पाडाळे (प्रभाग क्र.२२ ब) | काळेवाडी मधील विद्युत विषयक समस्या सोडवण्यात यावी तसेच एलईडी लाईट बसविण्यात यावे. नादुरुस्त असलेले दिवे दुरुस्त करण्यात यावे. | विद्युत |
| ४ | मा.उषा काळे | पवनानगर,विजयनगर येथेही एलईडी लाईट्स बसविण्यात यावे. | विद्युत |
| ५ | मा.अश्विनी चिंचवडे | तांबे साहेबांनी पाणी वाटपाचे जे डीस्ट्रीब्युशन केले आहे, ते लेखी स्वरुपात देण्यात यावे. ज्या ठिकाणी पाणी वाया जात आहे, तेथील वॉल्व्ह रिपेअर करण्यात यावे. नादुरुस्त पाईपलाईन्स दुरुस्त करण्यात येऊन पाणीगळती थांबविण्यात यावी. सुपरवायझर्स ने याकडे लक्ष द्यावे. | पाणीपुरवठा |
| ६ | मा. नामदेव ढाके | अनधिकृत नळजोडणी करणा-यांवर गुन्हे दाखल करा. | पाणीपुरवठा |
| ७ | मा. बाळासाहेब ओव्हाळ | (मामुर्डी) आदर्शनगर येथील रोड लवकरात लवकर करण्यात यावा. | स्थापत्य |
| ८ | मा.संगिता भोंडवे | विकासनगर येथे पाणी कमी येते, तेथील पाण्याची समस्या लवकरात | पाणीपुरवठा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | लवकर सोडवण्यात यावी. | |

क्षेत्रिय अधिकारी तथा सहाआयुक्त .

ब क्षेत्रिय कार्यालय पिं.चि.मनपा

चिंचवड पुणे ३३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब क्षेत्रिय कार्यालय ,चिंचवड

क्र.बक्षेका/ २ / १५ /२०१९

दिनांक - १६/११/२०१९

प्रति,

श्री.डॉ.अरुण दगडे
पशुवैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय - "ब"प्रभाग समिती मासिक सभेला उपस्थित राहणे बाबत..**

ब क्षेत्रिय कार्यालय प्रभाग समिती मासिक सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येते, या सभेत सर्व संबंधित शाखाप्रमुख यांनी उपस्थित राहणे

बंधनकारक आहे. तथापि सदर सभेस काही विभागांचे शाखाप्रमुख उपस्थित राहत नसलेबाबत सन्माननीय सदस्य यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.  तसेच सदर बाब मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणुन देण्यात यावी, असे मा.नगरसदस्यांनी सांगितले आहे.

माननीय नगरसदस्य यांनी आपले विभागाशी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर अभ्यासपुर्वक माहिती समिती सभेत देणेत यावी तसेच प्रभाग समितीत झालेल्या सभावृत्तांतातील ठरावांवर नियमाधीन कार्यवाही करणे बंधनकारक आहे, तरीही आपण मासिक सभेस उपस्थित नाहीत ही बाब कार्यालयीन शिस्तीस धरुन नाही,  तरी यापुढील सर्व मासिक सभेस उपस्थित राहणेकामी आपणास सुचना करणेत येत आहे.

क्षेत्रिय अधिकारी तथा सहाआयुक्त .

ब क्षेत्रिय कार्यालय पिं.चि.मनपा

चिंचवड पुणे ३३